# बृहन्मुंबई महानगरपालिका

**श्रीमती मनसादेवी तुलसीदास अगरवाल महापालिका रुग्णालय, मुलंड(प), मुंबई ४०००८०**

एमजीएच/ ३०० /ईएमडब्लु दि.१५/ ०४/२०२६

# जाहिरात

**श्रीमती म.तु.अगरवाल रुग्णालय,मुलुंड(प) रुग्णालयाच्या आस्थापनेवरील औषधनिर्माता, प्रयोगशाळा तंत्रज्ञ आणि क्ष-किरण तंत्रज्ञ संवर्गातील कंत्राटी तत्वावरील पद भरती**

मा. महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजूरी क्र. एमजीसी/एफ/८९२२/दि.१०.१२.२०२५ नुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत प्रमुख वैद्यकीय अधिक्षक व खाते प्रमुख (माध्यमिक आरोग्य सेवा) यांच्या अखत्यारितील श्रीमती म.तु.अगरवाल रुग्णालय, मुलुंड(प) यांच्या आस्थापनेवरील **औषधनिर्माता, प्रयोगशाळा तंत्रज्ञ आणि क्ष-किरण तंत्रज्ञ** संवर्गातील रिक्त पदे तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी तत्वावर ठोस मानधनावर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रदर्शित करुन भरावयाची आहेत. प्रस्तुत जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता धारण करीत असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर अर्ज **दिनांक १६/०४/२०२६ पासून ते दिनांक २४/०४/२०२६** (साप्ताहिक सुट्टी वगळून) पर्यंत संध्या ४:०० वाजेपर्यंत **प्रशासकीय कार्यालय दूसरा मजला श्रीमती म.तु.अगरवाल रुग्णालय,मुलुंड (प)** येथे स्विकारण्यात येणार आहे. उमेदवारांनी रु.७१० /- ( १८ % GST) चे चलान महापालिकेच्या नागरी सुविधा केंद्रात भरल्यानंतर अर्ज उपलब्ध करून देण्यात येईल. याबाबत रक्कम रु.७१० /- ( १८ % GST)चे चलन **प्रशासकीय कार्यालय दूसरा मजला श्रीमती म.तु.अगरवाल रुग्णालय,मुलुंड (प)** यांच्या कार्यालयात उपलब्ध करून देण्यात येईल.

**अर्ज स्वीकारण्याचा पत्ता :-**

**प्रशासकीय कार्यालय दूसरा मजला, श्रीमती म.तु.अगरवाल रुग्णालय,मुलुंड(प)**

**राजेंद्र प्रसाद रोड,कदमपाडा,मुलुंड(प)**

| अ.क्र | पदाचे नाव | कंत्राटी पध्द्तीने भरावयाची पदे | दरमहा ठोस वेतन | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| 1 | औषधनिर्माता | 01 | रू.20,000 | 1. उमेदवाराकडे राज्य शासनाच्या तंत्रशिक्षण मंडळाची फार्मसीमधील पदविका किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | फार्मसीमधील पदवी असणे आवश्यक आहे. (पदवीस प्राधान्य देण्यात येईल)<br>2. उमेदवार महाराष्ट्र फार्मसी कौन्सिलकिडे नोंदणीकृत असावा.<br>3. उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत 100 गुणांचा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असावा.<br>4. उमेदवार 'डी.ओ.ई.ए.सी.सी.' सोसायटीची 'सी.सी.सी.' किंवा 'ओ' स्तर किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे 'एम.एस.सी.आय.टी.' किंवा 'जी.ई.सी.टी.' चे प्रमाणपत्रधारक असावा |
| 2 | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | 01 | रू.20,000 | 1. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची मायक्रोबॉयोलॉजी विषयासह विज्ञान शाखेतील (Degree in B.Sc.) पदवी धारण करणारा असावा आणि मान्यताप्राप्त विद्यापीठाची (Maharashtra State Board of Technical Education) अथवा हाफकीन इनस्टीटयुट, परेल यांची पदविका डी.एम.एल.टी (Diploma in Medical Laboratory Technology) किंवा सी.एम.एल.टी धारण करणा-या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.<br>किंवा<br>उमेद्वार मान्यताप्राप्त विद्यापीठाची रसायनशास्त्र विषयासह बी.एस.सी पदवी धारण करणारा असावा<br>2. उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत 100 गुणांची मराठी विषय (उच्च स्तर किंवा निम्न स्तर ) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>3. उमेदवार 'डी.ओ.ई.ए.सी.सी.' सोसायटीची 'सी.सी.सी.' किंवा 'ओ' स्तर किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे 'एम.एस.सी.आय.टी.' किंवा 'जी.ई.सी.टी.' चे प्रमाणपत्रधारक असावा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | क्ष-किरण तंत्रज्ञ | 01 | रू.20,000 | 1. उमेदवाराने 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत चालविला जाणारा क्ष-किरण विषयातील बी.पी.एम.टी. (Bachelor in Paramedical Technology in Radiology) हा पूर्णवेळ 3 वर्षाचा पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला असावा व त्याने 6 महिन्यांची इंटरशीप पूर्ण केलेली असावी.<br>किंवा<br>उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदार्थ विज्ञान या मुख्य विषयासह (B.Sc. in Physics) उत्तीर्ण झालेला असावा व डायग्नोस्टिक सेंटर/रुग्णालय येथील क्ष-किरण विषयक कामाचा 2 वर्षाचा अनुभव असावा.<br>किंवा<br>उमेदवार हा 12 वी नंतर मान्यताप्राप्त संस्थेकडून/ विद्यापीठातून रेडियोग्राफी ही पदविका (Diploma in Radiography) उत्तीर्ण झालेला असावा व डायग्नोस्टीक सेंटर/रुग्णालय येथील क्ष-किरण विषयक कामाचा 2 वर्षाचा अनुभव असावा.<br>2.उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत 100 गुणांचा मराठी विषय (उच्च स्तर किंवा निम्न स्तर ) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>3. उमेदवार 'डी.ओ.ई.ए.सी.सी.' सोसायटीची 'सी.सी.सी.' किंवा 'ओ' स्तर किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे 'एम.एस.सी.आय.टी.' किंवा 'जी.ई.सी.टी.' चे प्रमाणपत्रधारक असावा |

**वयोमर्यादा**: उमेदवाराचे वय 18 वर्षापेक्षा कमी व 38 वर्षापेक्षा जास्त असता कामा नये.

**निवडीची कार्यपध्दती - निवडीचे निकष**

१. पदाच्या **सेवा**प्रवेश नियमानुसार अंतिम पदवी/ पदविका परीक्षा ३ पेक्षा जास्त प्रयत्नात (Attempt) उत्तीर्ण झालेल्या उमेद्वारांचा विचार केला जाणार नाही.

२. पदाच्या सेवाप्रवेश नियमांनुसार विहित केलेल्या अर्हता/अटी/शर्ती पूर्ण करीत असलेल्या पात्र उमेद्वारांनी त्यांच्या अंतिम वर्षातील प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

३.दोन किंवा अधिक उमेद्वारांचे अंतिम वर्षातील गुण समान झाल्यास उमेद्वाराच्या प्राधान्य क्रमाकरिता खाली दिलेले निकष क्रमवारीनुसार विचारात घेण्यात येतील.

*अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास धारण केलेली उच्च शैक्षणिक अर्हता

*उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक

* वरील निकष लागूनही उमेद्वारांचा गुणवत्ताक्रम समान येत असल्यास,वयाने जेष्ठ असलेल्या उमेद्वाराचा क्रम वरती लागेल.

४. उपरोक्त निकषांनुसार पुरेसे उमेद्वार उपलब्ध न झाल्यास निवडीचे निकष शिथिल करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांना राहतील.

**कर्तव्य व जबाबदा-या**

ज्या संवर्गातील पदावर तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी तत्वावर नियुक्त केलेल्या उमेद्वारांना त्यांच्या पदाची कर्तव्य व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील.

१. उमेद्वार रुग्णालय प्रमुख/ त्यांनी नेमून दिलेल्या वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी/वैद्यकीय अधिकारी/ अधिसेविका कार्यालय/संबंधित विभागप्रमुख यांच्या अखत्यारीत आणि मार्गदर्शनाखाली कर्तव्य पार पाडतील

२.उमेद्वारांना चक्रांकीत पध्द्तीने तीनही सत्रांमध्ये आवश्यकतेनुसार कर्तव्य बजावावे लागतील.

३. उमेद्वाराना नियमानुसार रुग्णालय प्रशासनाने तयार केलेल्या व रुग्णालय प्रमुख यांनी मंजूर केलेल्या ड्युटी लिस्टप्रमाणे साप्ताहीक सुट्टीचा लाभ मिळेल.

४.उमेद्वारांना परिपत्रक क्र.संचालक/वैशिप्ररू/३६४४ दि.१४.१०.२०२३ नुसार सहा महिन्यांकरिता समप्रमाणात एकूण ७ १/२ दिवस नैमित्तिक रजेचा लाभ संबंधित विभागप्रमुखांच्या पूर्वमंजूरीने देण्यात येईल.

५.उमेद्वारांना रुग्णालय प्रशासनाने/ रुग्णालय प्रमुख यांनी नेमून दिलेल्या वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी/वैद्यकीय अधिकारी यांच्या आदेशांनुसार अपवादात्मक/आपात्कालीन परिस्थितीमध्ये आवश्यक्तेनुसार रुग्णालयातील इतर विभाग, बाह्यरुग्ण विभाग, आंतररूग्ण विभाग आणि अतिदक्षता विभागामध्ये काम करावे लागेल.

६. कंत्राटी कर्मचा-यांना रुग्णालयांत कर्तव्य बजावतांना संबंधित विभागातील मार्गदर्शक तत्वे व कार्यप्रणालीचे पालन करावे लागेल. तसेच संबंधित रुग्णसेवेसाठीची न्याय वैद्यकीय (Medico legal) जबाबदारी घ्यावी लागेल.

७.उमेद्वारांनी रुग्ण व त्यांचे नातेवाईक, वरिष्ठ नागरीक, महापालिका वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी व समाजसेवी कार्यकर्त्यांशी सौजन्याने वागावे. महानगरपालिकेची व रुग्णालय प्रशासनाची प्रतिमा मलीन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

८. उमेद्वाराने कंत्राट कालावधीमध्ये रुग्णालयात काम करीत असतांना महापालिकेच्या नियमांचे उल्लंघन केल्यास,काही आक्षेपार्ह वर्तन केल्यास,संबधित विभागातील कामकाजाबाबत अकार्यक्षमता केल्याचे निदर्शनास आल्यास तसेच रुग्णसेवेमध्ये निषकाळजीपणा केल्याचे निदर्शनास आल्यास उमेद्वाराला कोणतीही पूर्वसुचना न देता त्याची कंत्राटी तत्वावरील नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यात येईल.

**सर्वसाधारण अटी व शर्ती**

१.रुग्णालयाच्या आस्थापनेवर असलेल्या रिक्त पदांचा उपलब्धतेनुसार आणि आवश्यक्तेनुसार कंत्राटी उमेद्वारांची नेमणूक करण्यात येईल. तथापि कंत्राटी उमेद्वारांना महापालिकेतील नोकरीवर हक्क सांगता येणार नाही.

२.जाहिरातीमध्ये दिलेली पदांची संख्या आवश्यक्तेनुसार कमी करण्यात येईल.

३.अर्ज स्वहस्ताक्षरात, सर्व दृष्टीने पूर्ण असावेत. अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

४.अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेद्वाराचे छायाचित्र त्याच्या स्वाक्षरीसह अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे त्याच छायाचित्राच्या दोन अतिरिक्त प्रती पुढील निवड प्रक्रियेसाठी उमेद्वाराने जवळ बाळगाव्यात.

५.उमेद्वारांनी स्वत: निश्चित करावयाचे आहे की ते आवेदित पदांच्या सर्व अर्हता व अटी पुर्ण करतात. उमेद्वार विहित अर्हता व अटी पुर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निर्दशनास आल्यास त्यांची उमेद्वारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता कंत्राटी तत्वावरील नियुक्ती रद्द करण्यात येईल.

६. पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पूर्ण असावा.

७. उमेद्वाराविरुध्द पोलीस चौकशी/ न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास, उमेद्वाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.

८.उमेद्वारांनी शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे/व्यावसायिक अर्हता/ संबंधित गुणपत्रिका/ अनुभवाचे प्रमाणपत्र/नेमणूक पत्र यांच्या मूळ प्रती व स्वसाक्षांकीत छायांकीत प्रतींसह पडताळणीसाठी उपस्थित रहावे.

९.प्राप्त अर्जांच्या संख्येनुसार मूळ कागदपत्रांच्या पडताळणीचा दिनांक, वेळ व ठिकाण उमेद्वारांना भ्मणध्वनी/ई-मेलद्वारे कळविण्यात येईल.

१०. उमेद्वारांना अर्ज सादर करण्यासाठी आणि पडताळणीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

११.निवड झालेल्या उमेद्वरांना संबधित पदावर कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यापूर्वी त्यांना रू.५००/- किमतीच्या स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

१२.कंत्राटी तत्वावर नियुक्त उमेद्वारांना निवासस्थानाची व्यवस्था केली जाणार नाही.

१३. कंत्राटी उमेद्वारांची आवश्यक्तेनुसार १६ उपनगरीय रुग्णालयात नेमणूक/बदली केली जाईल.

१४. उमेद्वारांची नेमणूक पुर्णत: कंत्राटी पद्धतीने प्रत्येक ४५ दिवसानंतर १ दिवस सेवाखंड देऊन एकावेळी सहा महिन्याच्या कालावधीकरिता करण्यात येईल. नियमित तत्वावर उमेद्वार प्राप्त झाल्यास सदरहू कंत्राटी उमेद्वाराची नियुक्ती तात्काळ प्रभावाने संपुष्टात येईल.

१५. सदर नियुक्ती कंत्राटी स्वरूपाची असल्याने त्यांना महापालिकेच्या नियमित सेवेमध्ये संबंधित पदावर कायमस्वरूपी नियुक्तीसाठी हक्क किंवा प्राधान्य मागता येणार नाही.

**विशेष सूचना**

१. यापुर्वी संबंधित कार्यालयात वा अन्य ठिकाणी सादर केलेले/ प्राप्त झालेले/ टपालाद्वारे सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज लिहिणे, स्विकारणे इत्यादीचा अधिकार दिलेला नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

२.जर एखाद्या उमेद्वाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

३.मध्यस्थ/ठग/मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविण्या-या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याचे आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेद्वारांना सूचना देण्यात येत आहेत.

४.प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत

**सही/-**
**प्रमुख वैद्यकीय अधिकारी**
**श्रीमती म.तु.अगरवाल रुग्णालय, मुलुंड (प)**